पंचायतराज व्यवस्थेतील इतर मागासवर्गीयांचे आरक्षण आणि नेतृत्वाचा अभ्यास : विशेष संदर्भ लातूर जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती)
या पदवीकरिता सादर केला जाणारा संशोधन आराखडा

संशोधक

जशन देवप्रिय डोळे

एम.ए., बी.एड

मार्गदर्शक

प्रा.डॉ. दयानंद माधवराव गुडेवार

एम.ए., बी.एड, एम.फिल, नेट, पीएच.डी.
राज्यशास्त्र विभागप्रमुख
उज्ज्वल ग्रामीण महाविद्यालय, घोणसी
ता.जळकोट जि.लातूर

संशोधन केंद्र

पीपल्स महाविद्यालय, नांदेड

मार्च २०२२

पंचायतराज व्यवस्थेतील इतर मागासवर्गीयांचे आरक्षण आणि नेतृत्वाचा अभ्यास : विशेष संदर्भ लातूर जिल्हा

प्रस्तावना

समाजातील प्रत्येक व्यक्तीचा विकास झाला तरच संपूर्ण राष्ट्राचा विकास होईल. कोणत्याही देशात समान विकासाच्या उद्दिष्टांत तेथील लोकांच्या आकांक्षा प्रतिबिंबित झालेल्या असतात. भारतात ही उद्दिष्टे भारताच्या संविधानात समाविष्ट केलेली आहेत. संविधानानुसार सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, त्याचप्रमाणे दर्जाची व संधीची समानता यावर आधारित असा समाज दृष्टीसमोर होता. घटनेने समाजवाद, धर्मनिरपेक्षता व लोकशाही गणराज्य घडविण्याचा संकल्पपूर्वक निर्धार केला आहे.

भारतामध्ये अनेक धर्म, जाती, भाषा असणारे लोक आहेत. सामाजिक संदर्भात भारतातील समाजात दोन टोकाच्या स्थिती अस्तित्वात आहेत. एकीकडे समाजातील फार मोठा घटक सामाजिक, आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे. त्यात अनुसूचीत जाती, जमाती, इतर मागास वर्ग, अल्पसंख्यांक तर दुसरीकडे उच्चशिक्षित, आर्थिकदृष्ट्या सबल व उच्च सामाजिक दर्जा तसेच राजकीय संधी उपलब्ध असलेला घटक आहे.

देशात एकूण लोकसंख्येच्या सुमारे ५० टक्के लोक इतर मागासवर्ग या प्रवर्गात मोडतात. त्यांच्या विकासाशिवाय देशाचा व राज्याचा विकास होणे शक्य नाही. म्हणून शासनाद्वारे इतर मागासवर्गीयांच्या विकासाला चालना देण्यासाठी आरक्षण मग ते शैक्षणिक असो, नोकरीविषयक असो वा राजकीय असो दिले गेले आहे. इतर मागासवर्गीय समाज मुख्य प्रवाहात यावा म्हणून या उपाययोजना करण्यात आल्या आणि मंडल कमिशन, इतर मागासवर्गीय आयोग इत्यादी संस्थात्मक निर्णय घेऊन इतर मागासवर्गीय समाजाला आधार देण्याचे काम करण्यात आले.

महाराष्ट्रात इतर मागासवर्गीय समाज बहुसंख्य आहे. त्यांना लोकशाहीत सहभागी करून घेण्यासाठी राजकीय आरक्षण देण्यात आले. जिल्हा परिषद, ग्रामपंचायत, पंचायत समिती या स्तरावर इतर मागासवर्गीयांना २७ टक्के आरक्षण देण्यात आले. यातून त्या

समाजातील लोकांना नेतृत्व करण्याची संधी मिळाली. यातून इतर मागासवर्गीय समाजाला प्रतिनिधीत्व मिळाले व त्यांचा मुख्य प्रवाहात येण्याचा प्रवास अधिक सुखद व सोपा झाला.

संदर्भ साहित्याचा आढावा

प्रस्तुत संशोधकाने आपल्या संशोधनासाठी “पंचायतराज व्यवस्थेतील इतर मागासवर्गीयांचे आरक्षण आणि नेतृत्वाचा अभ्यास : विशेष संदर्भ लातूर जिल्हा” हा विषय निवडला आहे. या व अशा विषयावर किंवा विषयाच्या अनुषंगाने संशोधन व साहित्य यांचा शोध घेण्यात आला. त्यावेळी काही प्राथमिक गोष्टी आढळून आल्या.

१) कु.माया शर्मा व कु. राजश्री शुक्ला यांनी “पंचायतराज व्यवस्था : नवीन ग्रामीण नेतृत्व का अर्विभाव” या संशोधनपर लेखामध्ये पंचायतराज मधून नवीन नेतृत्व उदयास आले आहे असा निष्कर्ष मांडला आहे.

२) डॉ.नीतू राणी यांच्या ’पंचायतीराज व्यवस्था सिद्धांत एवं व्यवहार’ या ग्रंथातून प्राचीन भारतीय पंचायतराज व्यवस्थेचा इतिहास सखोलपणे मांडला आहे.

३) प्रा.के.आर. बंग यांच्या ‘भारतातील स्थानिक स्वशासन विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य’ या ग्रंथात स्थानिक शासन व स्वशासनाचा इतिहास मांडला आहे.

४) डॉ.वा.भा. पाटील यांच्या ‘पंचायतराज’ या ग्रंथातून अनेक प्रश्नांची उत्तरे मिळतात.

५) डॉ.रवींद्र पांडुरंग भणगे यांच्या ‘आरक्षणाची वाटचाल आणि ओबीसी आरक्षण’ या ग्रंथात आरक्षणाच्या अविरत संघर्षाची आणि त्यामागच्या राजकारणाची वाटचाल सांगितली आहे.

६) लता प्रतिभा मधुकर यांच्या ‘ओबीसी पॉलिटिकल फॉरमेशन्स इन महाराष्ट्रा’ या संशोधनाचा देखील ओबीसी संकल्पना आणि त्यांचे महाराष्ट्रातील स्थान समजण्यास मदत झाली.

७) डॉ.दयानंद गुडेवार यांच्या “पंचायतराज व्यवस्थेतील महिला आरक्षण अपेक्षा वास्तव आणि वास्तव : विशेष संदर्भ लातूर जिल्हा” या संशोधनातून लातूर जिल्ह्यातील पंचायतराज व्यवस्था सखोल समजण्यास मदत झाली.

संशोधन विषयाची निवड

महाराष्ट्रात १९९४ मध्ये महाराष्ट्र जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत अधिनियम १९६१या कायद्यान्वये दुरूस्ती करून अनुच्छेद १२ (२) सी समाविष्ट करून इतर मागासवर्गीयांना २७ टक्के आरक्षण लागू केले होते. त्या आरक्षणाचा फायदा बहुतांश सामान्यजनांनी पंचायतराज मधील त्यांच्या नेतृत्व अपेक्षा होत्यात त्यात करून घेतला. असंख्य लोकांना यामुळे खऱ्या लोकशाहीच्या संकल्पनेत सहभागी होऊन नेतृत्व व काम करण्याची संधी मिळाली. मात्र मार्च २०२१ च्या आदेशानुसार हे राजकीय आरक्षण न्यायपालिकेने स्थगित कले आहे. म्हणून हा विषय सध्या चर्चिला जात आहे. कारण सुमारे ५६ हजार राखीव जागांवर याचा थेट परिणाम होणार आहे.

त्याच अनुषंगाने आरक्षणाचा इतिहास, पंचायतराज व्यवस्थेमधील इतर मागासवर्गीयांचे आरक्षण, त्या आरक्षणाचे आतापर्यंतचे फायदे/फलित, त्या आरक्षणाने निर्माण झालेले नेतृत्व आणि त्यांचे योगदान यांचा व इतर अशा सर्व प्रश्नांचा सखोल, वैज्ञानिक अभ्यास करण्यासाठी मी “पंचायतराज व्यवस्थेतील इतर मागासवर्गीयांचे आरक्षण आणि नेतृत्वाचा अभ्यास : विशेष संदर्भ लातूर जिल्हा” हा विषय निवडला आहे.

संशोधनाची उद्दिष्टये

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

१) पंचायतराज मधील इतर मागास वर्ग (OBC) आरक्षणाचा अभ्यास करणे.

२) पंचायतराज मधील इतर मागास वर्ग (OBC) आरक्षणाचे फलित/साध्य तपासणे.

३) पंचायतराज मधील इतर मागास वर्ग (OBC) आरक्षणामुळे झालेले फायदे तपासून उद्भवलेल्या सद्यःपरिस्थितीत या आरक्षणाची नेमकी गरज आणि महत्त्व तपासणे.

४) पंचायतराज मधील इतर मागास वर्ग (OBC) नेतृत्वाचा अभ्यास करून त्यांना झालेले फायदे आणि आलेल्या अडचणींचा अभ्यास करणे.

५) पंचायतराज इतर मागास वर्ग (OBC) नेतृत्वाने समाजाप्रती दिले असलेले योगदान तपासणे व त्याचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितकृत्ये

पंचायतराज व्यवस्थेतील इतर मागास वर्ग आरक्षण आणि नेतृत्वाचा अभ्यास करताना कोही समस्या संशोधकाला आढळण्याची किंवा जाणवण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने काही गृहितकृत्ये आधीच निश्चित केलेली आहेत. त्या संशोधनाअंती बदल होऊ शकतो.

१) पंचायतराज सदस्यांमध्ये इतर मागास वर्ग आरक्षणाबद्दल जागृती निर्माण झालेली आहे.

२) इतर मागासवर्गीय सदस्यांना आरक्षणामुळे नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे.

३) आजही पंचायतराज व्यवस्थेत राजकीय आरक्षणाची गरज आहे.

४) पंचायतराज व्यवस्थेत राजकीय आरक्षण नसल्यास इतर मागासवर्ग राजकीय विजनवासात ढकलला जाईल.

५) इतर मागासवर्गीय सदस्य हे पंचायतराज व्यवस्थेत समर्थपणे नेतृत्व करू शकतात.

संशोधन क्षेत्र

संशोधन क्षेत्र निश्चिती ही संशोधनाला योग्य मार्गावर नेण्यासाठी दिशादर्शक असते. त्याशिवाय योग्य आणि अपेक्षित तथ्य प्राप्ती होणे अशक्य असते. तेव्हा प्रस्तुत संशोधनाचे शीर्षक "पंचायतराज व्यवस्थेतील इतर मागासवर्गीयांचे आरक्षण आणि नेतृत्वाचा अभ्यास : विशेष संदर्भ लातूर जिल्हा" असे असल्याने प्रस्तुत संशोधन विषयाची व्याप्ती क्षेत्र लातूर जिल्ह्यातील पंचायतराज व्यवस्थेपर्यंत मर्यादित आहे.

तथ्य संकलन

संशोधनात तथ्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. तथ्यांच्या आधारावरच निष्कर्ष मांडले जातात. म्हणून ही तथ्ये शास्त्रीय पद्धतीने संकलित केली असली पाहिजेत. त्यामुळे प्रस्तुत संशोधन विषयाच्या संशोधनासाठी दोन प्रकारच्या तथ्यांचा उपयोग करण्यात येणार आहे. त्यात प्राथमिक तथ्य व दुय्यम तथ्य यांचा समावेश असेल.

प्राथमिक तथ्यांचे स्त्रोत म्हणून मुलाखत अनुसूची, प्रश्नसूची/प्रश्नावली यांचा वापर करण्यात येईल. त्यासाठी इतर मागासवर्गीय सदस्यांच्या मुलाखती घेण्यात येतील.

सहभागी निरीक्षण : जिल्हा परिषद लातूर, पंचायत समित्या, ग्रामपंचायतींच्या सभांना उपस्थित राहून सहभागी निरीक्षणातून तथ्य संकलन करण्यात येईल.

दुय्यम तथ्यांचे स्रोत म्हणून विविध ग्रंथालयामध्ये उपलब्ध असणारे संदर्भ ग्रंथ, अप्रकाशित शोधनिबंध, ज्ञानकोश, वर्तमानपत्रे, शासकीय अहवाल, साप्ताहिके, मासिके, संकेतस्थळे इत्यादी मधून माहिती प्राप्त केली जाईल.

नमुना निवड

संशोधनात निष्कर्षांना महत्त्वाचे स्थान आहे. निष्कर्ष जर सुयोग्य हवे असतील तर संशोधनातील नमुना निवड प्रातिनिधीक आणि योग्य असावी लागते. संशोधनाच्या यशस्वितेसाठी आणि सार्थकतेसाठी प्रातिनिधीक नमुन्याची आवश्यकता असते. समग्रातील सर्वांना प्रतिनिधीत्व मिळेल याची दक्षता या संशोधनात घेण्यात येईल.

लातूर जिल्हा हे अभ्यासक्षेत्र असल्याने लातूर जिल्ह्यात येणाऱ्या १० पंचायत समित्या, ०१ जिल्हा परिषदा व ७८६ ग्रामपंचायतींपैकी संभाव्यता नमुना निवड प्रकारातील साधा यादृच्छिक नमुना निवड प्रकारातील लॉटरी पद्धतीनुसार काही ग्रामपंचायती, काही पंचायत समित्या निवडून त्यांचा अभ्यास मुलाखत अनुसूची, प्रश्नावली आणि सहभाग निरीक्षण पद्धतीने केला जाईल. या तीनही स्तरावरील पंचायतराज मधील इतर मागासवर्गीय सदस्यांचा यात समावेश असेल.

संशोधनाच्या मर्यादा

प्रस्तुत संशोधन लातूर जिल्ह्यातील पंचायतराज व्यवस्थेतील तीन स्तरापुरते म्हणजेच जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांच्यापुरते मर्यादित असल्यामुळे स्थळ, काळ, वेळ, व्यक्ती, माहितीची अपूर्णता, मुलाखत देणाऱ्याचा निरसपणा इत्यादींच्या मर्यादा पडू शकतात.

संशोधन आराखडा

संशोधनाला दिशा देण्यासाठी, संशोधनातील उद्देश पूर्ण करण्यासाठी संशोधन आराखडा तयार केला जातो. संशोधन समस्येचा विचारपूर्वक अंदाज घेऊन त्या समस्येच्या निराकरणासाठी आराखड्याचे स्वरूप निश्चित करावे लागते. प्रस्तुत संशोधनाचा विषय

उद्देश लातूर जिल्ह्यातील पंचायतराज व्यवस्थेतील इतर मागासवर्गीय आरक्षणाचा अभ्यास करणे आहे. त्यामुळे अन्वेषणात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब करण्यात येईल. त्याआधारे संशोधनाची दिशा ठरवून तथ्य संकलनासाठी सर्वेक्षणात्मक, विश्लेषणात्मक, वर्णनात्मक आणि निदानात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

तथ्यांचे वर्गीकरण

संशोधनातील तथ्ये विखुरलेली असतात. त्यावरून निष्कर्ष काढणे कठीण असते. त्यामुळे काही विशिष्ट आधारावर तथ्यांना काही विशिष्ट वर्गामध्ये वर्गीकृत करणे आवश्यक असते. प्रस्तुत संशोधन विषयाच्या तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी तथ्यांचे वर्गीकरणाद्वरे वर्ग (प्रकरण) पाडून विश्लेषण करण्यात येईल.

प्रकरण मांडणी

प्रस्तुत शोधप्रबंधाची मांडणी खालीलप्रमाणे एकूण ०६ प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये विषयाची सविस्तर प्रस्तावना करून रुपरेषा स्पष्ट केली जाईल. संशोधन विषयाच्या संशोधन पद्धतीविषयी यात माहिती दिली जाईल. यात संशोधन विषयाची निवड, विषयाचे महत्त्व, उद्दिष्टे, गृहितके इत्यादींची सविस्तर मांडणी केली जाईल.

प्रकरण दुसरे- पंचायतराज व्यवस्था संकल्पना व स्वरूप

प्रस्तुत प्रकरणामध्ये पंचायतराजची संकल्पना, त्या संकल्पनेचा इतिहास, त्याचे स्वरूप, सद्यःस्थितीत त्याचे असलेले स्वरूप इत्यादी बाबींचा सविस्तर अभ्यास केला जाईल.

प्रकरण तिसरे - आरक्षणाची संकल्पना व इतर मागासवर्गीय आरक्षण

प्रस्तुत प्रकरणामध्ये आरक्षणाची मूळ संकल्पना, ऐतिहासिक स्वरूप, आरक्षणाचे महत्त्व, गरज, महाराष्ट्रातील, देशातील तसेच लातूर जिल्ह्यातील परिस्थिती आणि इतर

मागास वर्ग म्हणजे कोण? त्यांचे स्थान व त्यांचे आरक्षण इत्यादी संदर्भात सविस्तर अभ्यास केला जाईल.

प्रकरण चौथे - नेतृत्व संकल्पना व स्वरूप

प्रस्तुत प्रकरणामध्ये नेतृत्वाची संकल्पना, त्याचे विविध प्रकार व स्वरूप, मर्यादा इत्यादी संदर्भात सविस्तर अभ्यास केला जाईल.

प्रकरण पाचवे - लातूर जिल्ह्याची पार्श्वभूमी आणि इतर मागासवर्गीय नेतृत्वाचा अभ्यास

प्रस्तुत प्रकरणामध्ये लातूर जिल्हा निर्मितीचा इतिहास, लातूर जिल्ह्याचे भौगोलिक स्थान, प्रशासकीय विभाग, हवामान, उद्योगधंदे, लोकसंख्या, साक्षरता इत्यादींचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच या प्रकरणात लातूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद, पंचायत समित्या, ग्रामपंचायत या पंचायतराज व्यवस्थेतील इतर मागासवर्गीय नेतृत्वाचा, त्या सदस्यांचा नमुना निवड पद्धतीने निवडलेल्या सदस्यांचा मुलाखत, प्रश्नावली, अनुसूची इत्यादी मार्फत सविस्तर अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण सहावे - निष्कर्ष आणि शिफारशी

प्रस्तुत प्रकरणामध्ये वरील सर्व प्रकरणांच्या आधारे निष्कर्ष मांडण्यात येतील.

संशोधक	मार्गदर्शक
जशन देवप्रिय डोळे	**प्रा.डॉ.दयानंद माधवराव गुडेवार**